Day : ______________ Seat No : | | | | | | |

2021

01

(M)

MARATHI (02)

**Test Exam**

**Class : 12**

Time : 2.30 06 Pages Marks : 50

## कृतिपत्रिका

**सूचना :**(1) *आकलन कृती व व्याकरण यांमधील आकृत्या किंवा चौकटी पेनाने अथवा पेन्सिलीने काढाव्यात.*

(2) *स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखन नियमांनुसार लेखन याकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.*

## विभाग 1 गदय

10

**कृती 1 अ) खालील उता–याच्या आधारे चौकटी पूर्ण करा** (02)

1) घरोघर व दरडोई वाहन उपलब्ध असलेला देश ______________

2) माणसांवर स्वार होणारी ______________

2) **कृती करा** (02)

रस्ते कसे असतात.



अमेरिकेसारख्या विकसित देशात माणसे वेगाने जिवन जगतात. घरोघर आणि दरडोई वाहन उपलब्ध असते. रस्ते रूंद, सरळ, निर्विघन आणि एकमार्गी असतात. घरे, कार्यालये, बाजारपेठा यात निदान शंभर मैलांचे किमान अंतर असते. जवळच्या जवळ सगळे असे सहसा नसते. अंतरावरच्या गोष्टींशी जवळीक साधण्यासाठी दूरवर जावे लागते. यातून माणसा

माणसांत दुरावा निर्माण होतो. तो जाचदायक आणि असहय होऊ नये म्हणून वेगाचा आश्रय घेतला जातो. वेगामुळे माणसे बेभान होतात भान हरपले म्हणजे अस्वस्थता विरून जाते. वेगात एक बेहोषी असते.

भारतीयांनी अमेरिकन जीवनशैली पत्करण्याचे कारण नाही. आपल्याकडे अंतरे कमी आहेत. माणसे खूप आहेत. कामे फारशी नाहीत. जीवनाची टोके सहज साधता येतात. थोडी त्वरा करावी लागते, पण भरधाव वेगाने अंतर काटावे अशी स्थिती नसते. मुंबईसारखे विस्तीर्ण नगर गाडयांनी सांधलेले असते. गाडया रूळावरून चालतात. त्यात भरकटणे फारसे नसते. गाडीत चढले म्हणजे माणसांचे धावणे थांबते.

खरी अडचण असते ती रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या दोन आणि चारचाकी वाहनांची. त्यांचा वेग मर्यादित ठेवला तर ती साधने म्हणून उपयोगी पडतात. वेळ आणि श्रम वाचवण्यासाठी त्यांचा उपयोग होतो, पण अनेकदा असे घडते, की वाचलेला वेळ घालवावा कसा हे कळेनासे होते. आणि मग तो घालवण्यासाठी पुन्हा माणसे वाहनांच्या आहारी जातात. आरंभी माणसे वाहनांवर स्वार होतात. मग वाहने माणसांवर स्वार होतात.

3) **पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.** **(02)**

1) आश्रय घेणे –

2) भान हरपणे –

4) **स्वमत – अभिव्यक्ती** **(04)**

'अधिक वेग आत्मघातकी ठरतो' या विषयी तुमचे मत सविस्तर लिहा.

किंवा

वाहन चालवत असतांना कोणती काळजी घ्यावी. ते तुमच्या शब्दांत लिहा.

## विभाग 2 – पदय

**10**

**कृती 2 अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **(02)**

1)

| शेतीसंबंधी कवितेत आलेली विविध कामे | |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |

2) **कवितेतील 'यमक' जोडणारे शब्द शोधा** **(02)**

1) ____________________ ____________________
2) ____________________ ____________________
3) ____________________ ____________________
4) ____________________ ____________________

## रोज मातीत

सरी – वाफ्यात, कांदं लावते
बाई लावते
नाही कांदं ग, जीव लावते
बाई लावते
काळया आईला, हिरवं गोंदते
बाई गोंदते
रोज मातीत, मी ग नांदत
बाई नांदते

फुल सोन्याची, झेंडू तोडते
बाई तोडते
नाही फुलं ग, देह तोडते
बाई तोडते
घरादाराला, तोरण बांधते
बाई बांधते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

ऊस लावणे, बेणं दाबते
बाई दाबते
नाही बेणं ग, मन दाबते
बाई दाबते
कांडया – कांडयांनी, संसार सांधते
बाई सांधते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

उन्हा तान्हात, रोज मरते
बाई मरते
हिरवी होऊन, मागं उरते
बाई उरते
खोल विहिरीचं, पाणी शेंदते
बाई शेंदते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

3) **अभिव्यक्ती** **(04)**

रोज मातीत राबणाऱ्या शेतकरी स्त्रियांच्या कष्टमय जीवन शैलीचे वर्णन कवितेच्या आधारे लिहा.

अ) **कृती करा (कोणतीही एक)** **(02)**

**काव्यसौंदर्य**

अंगणात थांबलेल्या तुझ्या प्रेयस चांदण्याला दार उघडून आत घेण्याचेही भान नाही ग
तुला बागेतली ती अल्लड जाई ही पेंगुळतेय तुझी वाट पाहून पाहून
पण तू, तू मात्र झालीस अस्त्विहीन प्राण हरवलेली पुतळी.'

या ओळीमधील भावसौंदर्य स्पष्ट करा.

**किंवा**

**रसग्रहण**

रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा ।
गुंतुनी गुंत्यांत साऱ्या पाय माझा मोकळा ।
कोण जाणे कोठुनी हया सावल्या आल्या पुढे ।
मी असा की लागती हया सावल्यांच्या ही झळा ।

## विभाग – 3 साहित्यप्रकार – कथा

**10**

**कृती 3 : खालील उता–याच्या आधारे सूचने नुसार कृती करा.**

**अ – 1** **एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(02)**

क) कथानकाचे प्रयोजन लिहा.

ख) नाटयमयता निर्माण होणारा घटक लिहा.

प्रारंभी एखादी शिकवण देण्यासाठी, बोध देण्यासाठी कथालेखन केले गेले. नंतर – नंतर मनोरंजन करण्यासाठी किंवा एखादा विचार भावना, चित्ताकर्षन घटना वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कथा लिहिल्या जाऊ लागल्या. कथेत घटना असतात, कथानक असते, तिच्यात पात्रे असतात. स्थळ, काळ, वेळ, यांचाही उल्लेख कथेत असतो. कथेच्या विषयानुसार तिच्यात विशिष्ट वातावरणही असते आणि समर्पक अशी निवेदनशैली असते. कथेतील पात्रांच्या परस्परसंबंधातून निर्माण झालेले ताणतणाव, संघर्ष, गुंतागुंतही कथेत असते आणि या

सर्वांचा एक उत्कर्षाबिंदूही (क्लायमॅक्स) असतो कथेत। अर्थात या सर्व घटकांनी युक्त अशा कथेला समर्पक शेवटही असतो तसेच एक सुयोग्य आणि उत्तम शीर्षकही असते.

थोडक्यात सांगायचे तर ............. कथा म्हणजे ........

'एका विशिष्ट स्थलकाली पात्रांच्या परस्परसंबंधातून घडलेल्या घटनांचे एखादया विशिष्ट हेतूने केलेले उत्कंठावर्धक चित्रण म्हणजे कथा?

अर्थात प्रत्येक कथेत हे सर्वच घटक असतीलच आणि त्यांचे प्रमाणही सारखे असेल असे म्हणता येणार नाही. एखादया कथेत पात्रांना प्राधान्य असते तर एखादया कथेत प्रसंगांना. कधी लेखकाचा दृष्टीकोन अधिक महत्वाचा असू शकतो तर एखादी कथा वातावरण निर्मितीचा हेतू लक्षात घेऊन लिहिली जाऊ शकते. तीच गोष्ट विचारांची आणि भावनांचीही असू शकते. थोडक्यात, कथा म्हणजे केवळ प्रसंगांचे वर्णन नव्हे, केवळ व्यक्तींचे चित्रण नव्हे, निव्वळ दृष्टिकोन किंवा एकाच विचाराचा परिपोष नव्हे, तर कथा म्हणज पात्र, प्रसंग, संघर्ष, गुंतागुंत, वातावरण, विचार, भावना, निवेदनशैली अशा सर्वांचे एक सुसंघटित प्रकटीकरण होय,

2) **कथाकाराच्या 'पात्र' या शब्दरूप प्रतिमेची दोन वैशिष्टये लिहा.** **(02)**

3) **कथा म्हणजे ..................................** **(02)**

1) [ ]

2) [ ]

3) [ ]

4) [ ]

3) **'कथा आजही लोकप्रिय आहे' या विधाना बाबतचे तुमचे मत सौदाहरण स्पष्ट करा. (04)**

**किंवा**

**तुम्हाला आवडलेल्या कथेचे वर्णन करा.**

## विभाग 4 – उपयोजित मराठी

**कृती 4** **10**

**अ) खालील कृती सोडवा.**

1) मुलाखत म्हणजे काय? स्पष्ट करा. **(02)**

2) मुलाखत घेण्यामागील हेतू स्पष्ट करा? **(02)**

**आ) खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा** **(06)**

1) मुलाखत म्हणजे ......................... मुलाखतीचा पाया ................ ज्यांची मुलाखत घ्यायची त्यांच्या बद्यलची माहिती .......................... मुलाखतीचे उदिष्टये ................ मुलाखतीचे माध्यम ......................

**किंवा**

2) मुलाखतीचा हेतू ......................... मुलाखतीची सुरूवात .................. मुलाखतीचा मध्य ......................... मुलाखतीचा समारोप.

## विभाग 5 – व्याकरण व लेखन

**कृती 4 अ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे 200 ते 250 शब्दांत निबंध लिहा.** **(10)**

1) श्रावणातला पाऊस

2) मोबाईलचे मनोगत

3) डोंगर माथ्यावरील गाव

4) आमचे कोरोणा योद्धा

5) कोरोणा आणि आजचे सामाजिक जीवन